**MHAH180029632023**

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७२५/२०२३ मधील नि. २० वरील आदेश</u>

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२) वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही वादी प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मालकी हक्क वहिवाटीची मिळकत असुन दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी व वादीचे वडील राजेंद्र दामोधर गलांडे व चुलते शंकर दामोधर गलांडे यांचे दरम्यान घर मिळकतीचे दि. ०६/०५/२०१० रोजी नोटरी पब्लीक यांचे समोर दस्त क्र. १६७/२०१० नुसार वाटप केलेले आहे. सदरचे वाटपामध्ये वादीचे वडील राजेंद्र दामोधर गलांडे यांना दावा मिळकतीमध्ये आर.सी.सी. स्लॅब मधील दक्षिणेकडील असलेली जिन्याच्या दक्षिणेकडील तीन खोल्या व व्हरांडा अशी दिलेली आहे. तसेच, प्रतिवादी विलास दामोधर गलांडे यांना आर.सी.सी.स्लॅब मधील जिन्याच्या उत्तरेकडील दोन खोल्या व अर्धा पोर्च तसेच उत्तरेकडील पत्र्याची आर्धी खोली व त्या शेजारील पत्र्याचे अर्धे शेड तसेच शंकर दामोधर गलांडे यांना आर.सी.सी.स्लॅब मधील मध्यभागी असलेली जिन्याच्या उत्तरेकडील एक खोली, व्हरांडा व अर्धा पोर्च तसेच दक्षिणेकडील पत्र्याची आर्धी खोली व त्या शेजारील गायीचे पत्र्याचे शेड असे सदरचे वाटणीपत्राप्रमाणे दिलेले आहे. परंतु, सदर दावा दाखल कराताना वादी कडुन घर मिळकतीचे दि. ०६/०५/२०२० रोजी नोटरी पब्लीक यांचे समोर झालेले वाटपाबाबत मजकुर नमुद करणे अनावधानाने राहुन गेलेले आहे. सबब, वादीस दाव्यामध्ये दुरुस्ती करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे, वादीने प्रस्तुत दाव्यात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची विनंती या अर्जाव्दारे केली आहे. सदरचे दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात तसेच विनंती व मागणीमध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल होत

नाही. अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती न झाल्यास वादीचे कधीही कशानेही भरुन येणार नाही असे अपरिमित नुकसान होईल. सदरची दुरुस्ती दाव्यात करणे न्यायाचे कामी आवश्यक व गरजेचे झालेले असल्याने वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. म्हणुन, वादीने प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

३) प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे नि.क्र. ३० वर दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, वादीचा सदरचा अर्ज हा खोटा व बनावट आहे. वादीला सदरचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीला दाव्यामध्ये सदरचा अर्ज देण्याचा हक्क व अधिकार नाही, कारण सदरच्या दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. सदरच्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी यांनी त्यांचे बचावामध्ये जे म्हणणे दाखल केलेले आहे त्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी याने रे.मु.नं. ६९८/२०२३ या दाव्याचा उल्लेख करुन त्यामध्ये वादी यांनी जी या अर्जामध्ये दुरुस्ती मागितलेली आहे ती दुरुस्ती मे. न्यायालयाने मंजुर केल्यास प्रतिवादी यांनी त्याचे डब्ल्यु.एस मध्ये जो डिफेन्स घेतलेला आहे, तो स्ट्राईक आऊट होवुन जाईल. तसेच, वादीने जी काही दुरुस्ती मागितलेली आहे, त्या संदर्भात वादी यांनी नोटरी दस्तान्वये जे वाटपपत्र झालेले आहे ते दाखल केलेले आहे. परंतु, सदरच्या वाटणी पत्रान्वये शंकर दामोधर गलांडे यांचे नावाची सदर घराला नोंद असलेबाबत कागदोपत्री पुरावा या न्यायालयात दाखल केलेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये वादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज हा मेंन्टेनेबल नाही. म्हणुन प्रतिवादी यांनी वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४) सदरची दुरुस्ती करणे न्यायाचे कामी व वादीचे हिताचे दृष्टीने गरजेचे आहे. त्या अनुषंगाने वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्यात न्यायनिवाडा करण्यास कोणतीही कायदेशीर अडचण येणार नाही. सबब, वादीने दावा दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

५) वादी यांचे वकील व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

६) दाव्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात मुद्दे अजुन गठीत झालेले नाही. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज मंजुर केल्यास दावा गुणदोषावर चालविण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. त्यामुळे, वर नमुद केलेल्या कारणामुळे दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्ती गरजेची वाटते.

७) वादीने सदरच्या अर्जासोबत दि. ०६/०५/२०१० रोजीची वाटणीपत्र दाखल केलेले आहे. या वाटणीपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे दुरुस्ती ही दोन्ही पक्षांमधील वादाच्या मुद्दयांवर निर्णय देण्यासाठी आवश्यक आहे. वर नमुद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, सदरचे विशोधन दाव्याचे अंतिम निर्णयासाठी इष्ट व आवश्यक आहे. सबब, न्यायाचे हेतुस्तव पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाचे आत दुरुस्ती करावी व त्याच कालावधीत दाव्याची विशोधित प्रत अभिलेखावर दाखल करावी.

ADITYA KRISHNA SHINDE
2024.06.21 17:02:20 +0530

(आदित्य कृ. शिंदे)
३ रे सह दि.न्यायाधीश क.स्तर,
राहुरी

दिनांकः २०.०६.२०२४